**ठळक बातम्या**

- महापालिका निवडणुकांसाठी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला सुरुवात, ना हरकत प्रमाणपत्रासाठी इच्छुकांची धावपळ
- महापालिका निवडणुकीसाठी ठाकरे बंधुंच्या युतीची घोषणा उद्या होणार
- पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र निवडणूक लढवण्याची शक्यता
- राहुरी विधानसभा मतदारसंघात पुढच्या महिन्यात विशेष मतदार यादी पुनरीक्षण

**आणि**

- राष्ट्रपतींच्या हस्ते डॉ. जयंत नारळीकर यांना मरणोत्तर विज्ञानरत्न पुरस्कार प्रदान, राज्यातल्या ६ शास्त्रज्ञांचा विज्ञान श्री आणि विज्ञान युवा पुरस्कारानं गौरव

**<><><><><>**

राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशन पत्र भरण्याची प्रक्रिया आजपासून सुरू झाली. या निवडणुकीसाठी ३० डिसेंबरपर्यंत अर्ज स्वीकारले जातील आणि ३१ डिसेंबरला अर्जांची छाननी होईल. २ जानेवारी २०२६ पर्यंत उमेदवारांना माघार घेता येईल. ३ जानेवारीला निवडणूक चिह्नांचं वाटप होईल आणि अंतिम उमेदवार यादी प्रसिद्ध होईल. आवश्यकतेनुसार १५ जानेवारीला मतदान होणार असून १६ जानेवारीला मतमोजणी होईल.

सध्या ना हरकत प्रमाणपत्र मिळवण्यासाठी इच्छुक उमेदवार विविध करांचा भरणा करत असल्याचं चित्र दिसतंय. वैयक्तिक शौचालय वापराचा दाखला मिळवण्यासाठीही अर्ज येऊ लादले आहेत. जालना इथे आज पहिल्या दिवशी ८०४ उमेदवारी अर्जांची विक्री झाली तर नांदेडमध्ये ६६३ अर्जांची विक्री झाली. धुळे शहरात ६ ठिकाणी निवडणूक कार्यालयं सुरु करण्यात आली आहेत.

**<><><><><>**

महापालिका निवडणुकांसाठी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्यातल्या युतीची घोषणा उद्या होणार असल्याची माहिती खासदार संजय राऊत यांनी आज मुंबईत दिली.

दोन्ही पक्षांमध्ये जागा वाटप पूर्ण झालं असून मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, मीरा भाईंदर, नाशिक आणि पुणे महापालिका निवडणूक दोन्ही पक्ष एकत्र लढवतील, असं राऊत म्हणाले.

**- - होल्ड - संजय राऊत बाइट - - -**

**- <><><><><>**

पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीत शरद पवार आणि अजित पवार यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्रितरित्या निवडणूक लढवू शकतात, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी आज मुंबईत वार्ताहरांशी बोलताना दिली

**.... होल्ड- बाईट- शशिकांत शिंदे**

येत्या शुक्रवारपर्यंत या आघाडीची घोषणा होऊ शकते, असं अजित पवार यांनी पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत सांगितल्याची माहिती सूत्रांनी दिली. या आघाडीत काँग्रेसही सोबत असू शकते. यासंदर्भात अजित पवार यांचा फोन आला होता, अंतिम निर्णय प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि इतर नेत्यांशी चर्चा घेऊन होईल, असं आमदार सतेज पाटील म्हणाले.

**<><><><><>**

महापालिका निवडणुकीच्या अनुषंगानं काँग्रेस पक्षाच्या प्रचाराचा प्रारंभ आज काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी धुळ्यात केला. याशिवाय काँग्रेसनं ४० स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे. स्टार प्रचारकांच्या यादीत अल्पसंख्याक विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार इम्रान प्रतापगढी, राज बब्बर, कन्हैया कुमार, आमदार जिग्नेश मेवाणी यांच्यासह इतर नेत्यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

महानगरपालिका निवडणुकीत पैशाचा गैरवापर रोखण्यासाठी प्राप्तीकर खात्याच्या पुणे कार्यालयाने विशेष निवडणूक कक्षाची स्थापना केली आहे. ठाणे, उल्हासनगर, कल्याण-डोंबिवली, भिवंडी- निजामपूर, मीरा- भाईंदर, वसई-विरार, पनवेल, अहिल्यानगर , पुणे, पिंपरी - चिंचवड, सोलापूर, कोल्हापूर, इचलकरंजी आणि सांगली- मिरज -कुपवाड या महानगरपालिकांसाठी पुण्यात गुलटेकडी इथल्या प्राप्तिकर कार्यालयात हा कक्ष स्थापन

झाला असून तो निवडणूक आचारसंहिता संपेपर्यंत कार्यरत राहील. निवडणूककाळात काहीही अपप्रकारांबद्दल तिथे १८०० - २३३ - ०७०१ या टोलफ्री क्रमांकावर तक्रार करता येईल.

**<><><><><>**

केंद्रीय निवडणूक आयोग राज्यातल्या राहुरी विधानसभा मतदारसंघात SIR अर्थात विशेष मतदार यादी पुनरीक्षण प्रक्रीया राबवणार आहे. शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळं ही जागा रिक्त आहे. याअंतर्गत २९ डिसेंबरपर्यंत मतदान केंद्रांचं सुसुत्रीकरण होईल. ३ जानेवारीला मतदार यादीचा मसुदा प्रसिद्ध होईल. ३ जानेवारीपासून २४ जानेवारीपर्यंत त्यावर आक्षेप नोंदवता येतील आणि दावे दाखल करता येतील. ही संपूर्ण प्रक्रिया पूर्ण झाल्यावर १४ फेब्रुवारीला अंतिम मतदारयादी प्रसिद्ध होईल, असं निवडणूक आयोगानं कळवलं आहे.

**<><><><><>**

जगविख्यात खगोलशास्त्रज्ञ दिवंगत डॉ. जयंत नारळीकर यांना आज मरणोत्तर विज्ञानरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. राष्ट्रपती भवन इथं झालेल्या या सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आयुकाचे संचालक आर. श्रीयानंद यांनी हा पुरस्कार स्वीकारला. याशिवाय देशभरातल्या एकूण ८ शास्त्रज्ञांना विज्ञान श्री, १३ जणांना विज्ञान युवा आणि एका समुहाचा विज्ञान समुह पुरस्कारानं गौरव झाला. त्यात राज्यात विविध संशोधन संस्थांमधल्या ६ जणांचा समावेश आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधींकडून

***- - होल्ड व्हाइस कास्ट - - -***

*(मुंबईतल्या भाभा अणुशक्ती केंद्राचे डॉक्टर युसुफ मोहम्मद शेख यांना अणू ऊर्जा क्षेत्रासाठी, मुंबईतल्या टाटा मूलभूत संशोधन संस्थेतले प्राध्यापक महान एम. जे. यांना गणितासाठी, मुंबईतल्या इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीचे कुलगुरू प्राध्यापक अनिरुद्ध पंडित यांना अभियांत्रिकीसाठी आणि नागपूरच्या नीरीचे डॉक्टर एस. वेंकट मोहन यांना पर्यावरण क्षेत्रातल्या उल्लेखनीय कार्यासाठी विज्ञान श्री पुरस्कारानं राष्ट्रपतींनी गौरविलं.*

*जैविक शास्त्रासाठी बेंगळुरूच्या जीवशास्त्रीय संस्थेच्या डॉक्टर दीपा आगाशे, मुंबईच्या टीआयएफआरचे प्राध्यापक सब्यसाची मुखर्जी यांना गणितासाठी आणि पुण्यातल्या आयुकाचे प्राध्यापक सुहृद मोरे यांना पदार्थ विज्ञान क्षेत्रातल्या कामगिरीसाठी विज्ञान युवा या पुरस्कारानं गौरवण्यात आलं.)*

<><><><><>

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी वाल्मिक कराड आणि त्यांच्या सहकाऱ्यांविरोधात आज आरोप निश्चित झाले. वाल्मिक  कराड आणि त्यांच्या साथीदारांनी ही हत्या केल्याचं आरोपपत्रात नमूद आहे, असं विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम म्हणाले.

**- - - होल्ड - बाइट - निकम (२३  सेकंद) - -**

कारागृहात असलेल्या आरोपींना हे आरोप वाचून दाखवण्यात आले. त्यांनी हे सर्व आरोप फेटाळल्याची माहिती निकम यांनी दिली.

<><><><><>

खरीप हंगाम २०२४-२५ मध्ये शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत भरड धान्य खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणीला ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. धान, मका, ज्वारी, रागीसह भरड धान्य उत्पादक शेतकऱ्यांना याचा फायदा मिळेल.

<><><><><>

मुंबईत वेगाने वाढणाऱ्या हवा प्रदूषणाची दखल घेऊन महानगरपालिका आणि प्रदूषण नियंत्रण मंडळानं तातडीनं उपाययोजना कराव्यात असे निर्देश आज मुंबई उच्च न्यायालयानं दिले. मुंबईत हवेचा गुणवत्ता निर्देशांक घरसत असल्याबद्दल दाद मागणाऱ्या याचिकासमूहावर मुख्य न्याायधीश न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अखंड यांच्या खंडपीठासमोर सुनावणी सुरु आहे. न्यायालयाचा विकासाला विरोध नाही मात्र प्रदूषणाला आळा घालण्यासाठी जारी केलेल्या दिशानिर्देशांचं काटोकोर पालन झालं पाहिजे अशा शब्दात न्यायालयानं ताशेरे ओढले.

<><><><><>

पुरंदर विमानतळाच्या भूसंपादनासाठी जास्तीत जास्त दर देण्याचा विचार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज सांगितलं. त्यांनी आज विमानतळ प्रकल्पबाधित गावातल्या प्रतिनिधींशी संवाद साधला.

<><><><><>

गेल्या २४ तासात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय घट झाली आहे.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

//<><><><><>//